मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपील क्रमांक ८९२८/२०१५ व इतर याचिकांमध्ये दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अधिसंख्य पदावर करण्यात आलेल्या नियुक्त्यांना मुदतवाढ देणेबाबत....

महाराष्ट्र शासन
माहिती व जनसंपर्क विभाग
शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२१/८६६/प्र.क्र.१६१/मावज-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २४ ऑगस्ट, २०२६

वाचा :- १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र. ३०८/१६-ब, दि. २१.१२.२०१९
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. मावज-२०१९/प्र.क्र. २१०/३४-अ, दि. ०४.०२.२०२०
३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-२०२०/प्र.क्र. १८७ अे/१६-ब, दि. ३०.०६.२०२०
४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. मावज-२०२०/प्र.क्र. ३१/३४-अ, दि. २५.०८.२०२०
५. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र. ३०८/१६-ब, दि. २७.११.२०२०
६. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. मावज-२०२०/६२/प्र.क्र.७/३४-अ, दि. ०३.०३.२०२१
७. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र. प्रविस्था-२ (२०२१) अधिसंख्य/का-१/७६१, दि.३०.०३.२०२१
८. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र. ३०८/१६-ब, दि. २८.१०.२०२१
९. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. मावज-२०२१/६२/प्र.क्र. ७/३४-अ, दि. ०६.१२.२०२१
१०. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र. ३०८/१६-ब, दि. १४.१०.२०२२
११. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र. प्रविस्था-२ (२०२१) अधिसंख्य/का-१/७६१, दि.१०.०३.२०२२
१२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण-२०२१/८६६/प्र.क्र.१६१/३४-अ, दि. ०९.१२.२०२२
१३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-२०१९/प्र.क्र. ५८१ए/१६-ब, दि. १४.१२.२०२२
१४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण-२०२१/८६६/प्र.क्र.१६१/३४-अ, दि. ३०.१०.२०२३
१५. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीबीसी-११२३/प्र.क्र.२९/आरक्षण-२, दि.०४.१०.२०२४
१६. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण-२०२१/८६६/प्र.क्र.१६१/३४-अ, दि. ०२.१२.२०२४
१७. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-११२३/प्र.क्र. २९ए/१६-ब, दि. १८.०९.२०२५
१८. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण-२०२१/८६६/प्र.क्र.१६१/३४-अ, दि. २४.०९.२०२५
१९. शासन निर्णय (शुध्दीपत्रक), सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण-२०२१/८६६/प्र.क्र.१६१/३४-अ, दि. २०.११.२०२५
२०. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. न्यायप्र-२०२०/३८७/प्र.क्र.११३/३४-अ, दि. ०७.०४.२०२६
२१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण-२०२५/१५/प्र.क्र.०७/३४-अ, दि. १४.०५.२०२६
२२. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे पत्र क्र. प्रविस्था-२ (२०२६)/अधिसंख्य पदे/का-१/१५२१, दि.१७.०७.२०२६

प्रस्तावना :-

मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपील क्र.८९२८/२०१५ व इतर यामध्ये दि.०६.०७.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांना

अधिसंख्य पदावर वर्ग करण्याबाबतची कार्यवाही संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आली आहे.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या गट-अ ते गट-ड मधील एकूण ९ अधिकारी व कर्मचाऱ्यांना उक्त संदर्भ क्र.६,८,९,१२,१४,१६ व १८ येथील शासन निर्णयान्वये त्यांचा अधिसंख्य पदावरील कालावधी संपुष्टात आल्यानंतर पुढील ११ महिने किंवा त्यांच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यत किंवा यासंदर्भात मा.मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार सामान्य प्रशासन विभाग/१६-ब मार्फत शासन निर्णयान्वये उचित निर्देश प्राप्त होईपर्यत यापैकी जे अगोदर घडेल ते, तोपर्यत अधिसंख्य पदावर पुढील ११ महिन्याच्या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात आली होती.

संदर्भ क्र.१९, सामान्य प्रशासन विभाग /मावज-२(३४-अ), शासन निर्णय (शुद्धीपत्रक) दिनांक २०.११.२०२५ अन्वये श्री. विनोद रापतवार यांच्या सेवानिवृत्तीचा दिनांक ३१.०८.२०२६ अशी दुरूस्ती करण्यात आल्याने श्री विनोद रापतवार यांनाही दिनांक ०७.०७.२०२६ पर्यत मुदतवाढ देण्यात आली होती.

संदर्भ क्र.२०, सामान्य प्रशासन विभाग/मावज-२ , शासन निर्णय दि. ०७.०४.२०२६ अन्वये शासन निर्णय दि. २५.०८.२०२० कायम ठेवण्यात आले असल्याने श्री. अनिलकुमार आलूरकर, उपसंचालक(माहिती) यांना दि.२५.०८.२०२० पासूनच्या शासन निर्णयानुसार अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आले आहे.

संदर्भ क्र. २१, सामान्य प्रशासन विभाग/मावज-२ , शासन निर्णय दि.१४.०५.२०२६ अन्वये श्री.गंगाधर माणिका निरडे, शिपाई (संदेशवाहक), यांचे अधिसंख्य पदावरील नियुक्तीचे आदेश त्यांच्या अधिसंख्य पदावरील नियुक्तीच्या दिनांकापासून रद्द करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

संदर्भ क्र.१८ सामान्य प्रशासन विभाग/३४-अ, शासन निर्णय दिनांक २४.०९.२०२५ अन्वये अधिसंख्य पदांना दिलेली मुदतवाढ दि.०७.०७.२०२६ रोजी संपुष्टात आली आहे.

सबब, उक्त संदर्भ क्र.१५ येथील सामान्य प्रशासन विभाग/आरक्षण-२ यांचा शासन निर्णय दि.०४.१०.२०२४ मधील तरतुदीनुसार अनुसुचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे/अवैध ठरल्यामुळे अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील एकुण अधिकारी/कर्मचारी यांना आतापर्यत देण्यात आलेल्या प्रत्येक ११ महिन्याच्या सेवेनंतरचा १ दिवसाचा तांत्रिक खंड सर्व सेवा विषयक (पदोन्नती व अनुकंपा धोरण वगळून) सेवानिवृत्ती विषयक लाभांसाठी क्षमापित करण्याबाबत व माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अधिसंख्य पदांवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्या पदांवर पुढील मुदतवाढ देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

सामान्य प्रशासन विभाग/आरक्षण-२ यांच्या संदर्भ क्र.१५ येथील शासन निर्णय दि.०४.१०.२०२४ मधील तरतुदीनुसार अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे/अवैध ठरल्यामुळे अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील खालील संबंधित

अधिकारी/कर्मचारी यांना आतापर्यंत देण्यात आलेल्या प्रत्येक ११ महिन्याच्या सेवेनंतरचा १ दिवसाचा तांत्रिक खंड क्षमापित करण्याबाबत व सदर अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्या पदांवर पुढील ११ महिन्यांसाठी मुदतवाढ देण्याबाबत या शासन निर्णयान्वये पुढीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे :-

(अ) माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२१.१२.२०१९ च्या शासन निर्णयानुसार अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या खालील एकूण ९ अधिकारी/ कर्मचारी यांना आतापर्यंत उक्त संदर्भाधीन विविध शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या प्रत्येक ११ महिन्याच्या सेवेनंतरचा १ दिवसाचा तांत्रिक खंड, सर्व सेवा विषयक (पदोन्नती व अनुकंपा धोरण वगळून) व सेवानिवृत्ती विषयक लाभांसाठी क्षमापित करण्यात येत आहे. तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.२४.०९.२०२५ अन्वये माहिती जनसंपर्क महासंचालनालयातील एकूण ९ अधिकारी/कर्मचारी यांना दि.०७.०८.२०२५ रोजी देण्यात आलेला १ दिवसाचा तांत्रिक खंड क्षमापित करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकारी /कर्मचारी यांचे नाव	कार्यरत असलेले पद
१	श्री. अनिलकुमार आलूरकर	उपसंचालक(माहिती), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
२	श्री. विनोद नरहरराव रापतवार	वरिष्ठ सहायक संचालक (माहिती), गट अ (कनिष्ठ), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
३	श्रीमती प्रज्ञा भु. गायकवाड	पर्यवेक्षक, गट-क, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
४	श्री. अशोक गणपती सोनकुसरे	दूरमुद्रणचालक, गट-क, संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नागपूर-अमरावती विभाग, नागपूर.
५	श्री. सुधीर किशनराव मग्गीरवार	लिपिक-टंकलेखक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
६	श्रीमती दर्शना जि. बस्वत	लिपिक-टंकलेखक, गट-क, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
७	श्री. मोहन मोतिराम कोळी	वाहनचालक, गट-क, जिल्हा माहिती कार्यालय, लातूर.
८	श्री. अशोक भिवसन सुरडकर	मतदनीस, गट-ड, संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मराठवाडा विभाग, संभाजीनगर यांचे कार्यालय, संभाजीनगर.
९	श्रीमती प्रिया राजू रामटेककर	लघूलेखक (नि.श्रे), गट क, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.

(ब) माहिती जनसंपर्क महासंचालनालयातील उपरोक्त नमूद अनु.क्र.१ ते ९ येथे नमुद एकूण ९ अधिकारी/कर्मचारी यांना सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय दि.२१.१२.२०१९ मधील तरतुदीनुसार दि.०८.०७.२०२६ रोजीचा १ दिवसाचा तांत्रिक खंड देवून पुढील ११ महिन्याच्या कालावधीकरीता म्हणजेच (दि.०९.०७.२०२६ ते दि.०८.०६.२०२७ पर्यत) किंवा ते सेवेत राहिले असते तर ते ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यंत, यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत त्यांच्या अधिसंख्य पदावरील नियुक्तीस खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे :-

अ. क्र.	अधिकारी / कर्मचाऱ्याचे नाव	पदनाम व गट	नियुक्तीचा दिनांक	सेवा निवृत्तीचा दिनांक	११ महिन्याच्या सेवासमाप्ती/ अधिसंख्य पदावर सेवा समाप्तीचा दिनांक	तांत्रिक खंडाचा दिनांक	नियुक्तीस पुढील ११ महिन्यासाठी खालील कालावधीसाठी मुदतवाढ
१	श्री. अनिलकुमार आलूरकर	उपसंचालक(माहिती), गट-अ (वरिष्ठ) विभागीय माहिती कार्यालय, अमरावती	१५.०५.१९९५	३१.०१.२०२८	०७.०७.२०२६	०८.०७.२०२६	०९.०७.२०२६ ते ०८.०६.२०२७
२	श्री. विनोद नरहरराव रापतवार	वरिष्ठ सहायक संचालक (माहिती) गट-अ, (कनिष्ठ), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.	२४. ०३. १९९५	३१. ०८. २०२६	०७.०७.२०२६	०८.०७.२०२६	०९.०७.२०२६ ते ३१.०८.२०२६

३	श्रीमती प्रज्ञा भु. गायकवाड	पर्यवेक्षक, गट-क माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.	१५. ०४. १९९४	३०.०६. २०३०	०७.०७.२०२६	०८.०७.२०२६	०९.०७.२०२६ ते ०८.०६.२०२७
४	श्री. अशोक गणपती सोनकुसरे	दूरमुद्रणचालक, गट-क संचालक, नागपूर-अमरावती विभाग, नागपूर.	०२. ०४. १९९४	३१. १२. २०२९	०७.०७.२०२६	०८.०७.२०२६	०९.०७.२०२६ ते ०८.०६.२०२७
५	श्री. सुधीर किशनराव मग्गीरवार	लिपिक- टंकलेखक, गट-क माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.	०४. ०९. १९९८	३१. १०. २०२९	०७.०७.२०२६	०८.०७.२०२६	०९.०७.२०२६ ते ०८.०६.२०२७
६	श्रीमती दर्शना जि. बस्वत	लिपिक- टंकलेखक, गट-क माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.	०८. ०८. १९९७	३१. ०३. २०३०	०७.०७.२०२६	०८.०७.२०२६	०९.०७.२०२६ ते ०८.०६.२०२७
७	श्री. मोहन मोतिराम कोळी	वाहनचालक, गट-क जिल्हा माहिती कार्यालय, लातूर.	२७. १२. १९९५	३१.०५. २०२८	०७.०७.२०२६	०८.०७.२०२६	०९.०७.२०२६ ते ०८.०६.२०२७
८	श्री. अशोक भिवसन सुरडकर	मदतनीस, गट-ड संचालक, मराठवाडा विभाग, औरंगाबाद यांचे कार्यालय, आारंगाबाद.	१७. ०३. १९९८	३०. ०४. २०२९	०७.०७.२०२६	०८.०७.२०२६	०९.०७.२०२६ ते ०८.०६.२०२७
९	श्रीमती प्रिया राजू रामटेककर	लघूलेखक (नि.श्रे), गट क माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.	१७.०३.१९९७	३०.०९.२०३१	०७.०७.२०२६	०८.०७.२०२६	०९.०७.२०२६ ते ०८.०६.२०२७

(क) माहिती जनसंपर्क महासंचालनालयातील सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२१.१२.२०१९ च्या शासन निर्णयापूर्वी उपरोक्त अ) मध्ये नमूद एकूण ९ अधिकारी/कर्मचाऱ्यांपैकी ज्या कर्मचाऱ्यांना सेवामुक्त केल्यानंतर अधिसंख्य पदावर नियुक्ती देण्यात आलेली आहे, अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांचा सेवामुक्त केल्याच्या दिनांकापासून अधिसंख्य पदावर पुनर्नियुक्तीपर्यंतचा कालावधी (खंड), महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ अनुसार केवळ निवृत्ती विषयक लाभ मिळणेसाठी क्षमापित करण्यात येत आहे. तथापि, अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांना सेवा मुक्त केल्याच्या दिनांकापासून अधिसंख्य पदावर नियुक्ती करेपर्यंतच्या कालावधीची गणना कोणत्याही सेवा विषयक व सेवानिवृत्ती विषयक लाभांसाठी अर्हताकारी सेवा म्हणून ग्राह्य धरण्यात येणार नाही.

(ड) माहिती जनसंपर्क महासंचालनालयातील उपरोक्त परिच्छेदातील (अ) येथे नमूद एकूण ९ अधिसंख्य पदावरील अधिकारी/कर्मचारी पदोन्नतीस पात्र नसल्याने त्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय होणार नाही.

२. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने उक्त संदर्भ क्र.१५ येथे नमूद सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०४.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार तात्काळ कार्यवाही करावी.

३. उपरोक्त अधिकारी/कर्मचारी हे माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील कार्यालयात कार्यरत असल्याने त्यांच्या वेतनावर होणार खर्च त्या कार्यालयाच्या वेतनासंबंधित लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा आणि संबंधित वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४.	सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दि.२८.१०.२०२१, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-२०१९/प्र.क्र.५८१ए/१६-ब, दि.१४.१२.२०२२, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीबीसी-११२३/प्र.क्र.२९/आरक्षण-२, दि.०४.१०.२०२४ व शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-११२३/प्र.क्र. २९ए/१६-ब, दि. १८.०९.२०२५ अन्वये दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने सदर नियुक्त्यांना या शासन निर्णयान्वये मुदतवाढ देण्यात येत आहे.

५.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२६०८२४१५३५२२४१३८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

YUVRAJ MANOHAR SOREGAONKAR

Digitally signed by YUVRAJ MANOHAR SOREGAONKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=F7CCDB18D954BB814D3CC3C92AB0C128E19F5F95C724ABAF0A38FA1A74DEC734, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1A45294B68B97E03C570AFA8F17C64F6DFE2A4A241DD2AFF2322FEEC22B389F5, cn=YUVRAJ MANOHAR SOREGAONKAR
Date: 2026.08.24 15:36:46 +05'30'

(युवराज सोरेगांवकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. प्रधान सचिव (मा.व ज.)/महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञयेता / लेखा परिक्षा), महाराष्ट्र १ /२, मुंबई/नागपूर.
३. संचालक (माहिती) (प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
४. उपसंचालक (लेखा) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
७. सर्व विभागीय माहिती कार्यालय / जिल्हा माहिती कार्यालय, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
८. संबंधीत जिल्हा कोषागार अधिकारी.
९. सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन-१६ब) मंत्रालय, मुंबई.
१०. वित्त विभाग (कार्यासन आ.पु.क.) मंत्रालय, मुंबई.
११. संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना (मा.व ज. मार्फत)
१२. निवडनस्ती.